दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे

RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ शनिवार, ०४ एप्रिल २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : ३५३ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## पिंपळपाडा व घानवळ ते बलध्याचा पाडा या रस्त्याच काम निकृष्ट दरज्याच असल्यामुळे स्थानिक नागरिकांनी काम थांबवल!



महाराष्ट्र जीत

**अमोल टोपले मोखाडा:-**पिंपळपाडा ते घानवळ गावच्या रस्त्याच काम अतिशय निकृष्ट दरज्याचे असल्याने स्थानिक ग्रामस्थ मंडळीने केला विरोध या रस्त्याचे काम हे गेल्या अनेक वर्षा पासून पेंडिंग होत त्यात घानवळ जांभूळ माथा व बालध्याचा पाडा येथील नागरिक व विद्यार्थी यांना अतिशय एसटी बस मिळत नव्हती तालुक्यात जायला व दवाखान्यात जायला या नागरिकांना प्रायव्हेट जीप मधून बसच्या दुपट्टीने भाडे देऊन प्रवास करावा लागायचा परंतु आता हा रस्ता बनवायला सुरवात होऊन गेले काही दिवस झाले असून या रस्त्याच काम घानवल गावापर्यंत आल असता तेथील गावकरी यांनी बघितल असता रस्त्याच्य काम अतिशय नितकृष्ट दरज्याचे दिसल्याने स्थानिक लोकांनी रस्त्याचा विरोध केला व काम थांबवल.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरी करूया – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक संपन्न

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांनी आणि संविधानाने देशाला प्रगतीची दिशा मिळाली आहे. त्यांचे कार्य आणि त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी दिलेले योगदान समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे हे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त होणारा कार्यक्रम दरवर्षी अधिक उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत असून, यावर्षीही विविध विभागांच्या समन्वयातून तो अधिक भव्य स्वरूपात साजरा करण्यात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा सोहळा त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरा करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल, २०२६ रोजीच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस बैठकीस सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, माजी आमदार प्रकाश गजभिये, मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, भन्ते डॉ. राहूल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, दादर चैत्यभूमी स्मारक समितीचे प्रतिनिधी यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यामागील उद्देश केवळ औपचारिकता नसून त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे असा आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानांपैकी एक असून, त्यातील समावेशकतेच्या तत्त्वामुळे भारत विकसित राष्ट्राकडे वाटचाल करत आहे. समाजाला मिळणाऱ्या संधी, हक्क आणि प्रगती यामागे कोणाचे योगदान आहे, हे नव्या पिढीला समजणे आवश्यक आहे. त्यामुळे जयंती सोहळा हा केवळ उत्सव न राहता विचारांचा प्रसार करणारा पर्व ठरतो.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दि.१४ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या जयंती उत्सवासाठी देशभरातून लाखो नागरिक चैत्यभूमीवर येतात. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर चैत्यभूमी परिसरात अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायी आणि नागरिकांसाठी आवश्यक सोयीसुविधांची सर्वंकष व्यवस्था करण्यात यावी. उष्णतेपासून संरक्षण मिळावे यासाठी ठिकठिकाणी मंडप उभारण्यात यावेत.

## सौं. भक्तीताई नेमाने यांना ‘सप्त मातृका पुरस्कार’ प्रदान

महाराष्ट्र जीत

**कारंजा लाड/ मनीष भेलांडे :** येथील संगीत विशारद सौं. ह.भ.प. भक्तीताई निकेत नेमाने यांना धर्म क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मानाचा ‘सप्त मातृका पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

शेगाव येथे आयोजित महाराष्ट्र विश्व मांगल्य सभेच्या अधिवेशनात अंजनगाव सुर्जी मठाचे मठाधीपती आचार्य स्वामी श्री. जितेंद्रनाथ महाराज यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सौं. भक्तीताई नेमाने यांनी विठ्ठल नामजप व महिला भजनी मंडळाच्या माध्यमातून समाजजागृतीचे कार्य प्रभावीपणे केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला. त्यांचे माहेर अकोला येथील असून, तेथील गोरक्षण संस्थान व बालिकाश्रम येथे त्या नियमितपणे नामस्मरण व भजनाद्वारे धर्मजागृती व संस्कार रुजविण्याचे कार्य करतात.

विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात त्या नामजप व भजनाची सेवा देत असून, समाजाला योग्य



मार्गावर चालण्यासाठी प्रेरित करतात. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत त्यांनी धर्म व समाजसेवेचे कार्य सातत्याने पुढे नेले आहे. त्यांना मिळालेला हा पुरस्कार कारंजा शहरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.त्यांच्या या यशाबद्दल वारकरी संप्रदाय, विठ्ठल परिवार तसेच विविध सामाजिक स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. त्या आपल्या या यशाचे श्रेय गुरुवर्य वै. बोदे बाबा, वै. रंगराव बाबा, आई-वडील सौ. लताताई हातोलकर व दिलीपराव हातोलकर तसेच पती निकेतराव नेमाने यांना देतात.

# राज्यस्तरीय शालेय टेनिकॉईट स्पर्धेत जे.डी.चवरे विद्यामंदिरची चमू विजयी

### 17 वर्षवयोगटात मुलांच्या चमूने प्राप्त केले गोल्ड मेडल

महाराष्ट्र जीत

**कारंजा लाड/ मनीष भेलांडे :** ता. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशीम व वाशीम जिल्हा टेनिकॉईट संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दि . 27 ते 29 मार्च या दरम्यान घेण्यात आल्या. शालेय टेनिकॉईट स्पर्धेत येथील जे.डी. चवरे विद्यामंदिर च्या खेळाडूंनी 17 वर्ष मुलांच्या वयोगटात घवघवीत यश प्राप्त केले. यामध्ये 5 खेळाडूंचा समावेश आहे.

राज्यस्तरीय शालेय टेनिकॉईट स्पर्धेत सर्वच गटाच्या मुला व मुलींच्या स्पर्धा वाशीम जिल्हा क्रीडा संकुल येथे पार पडल्या. स्पर्धेत अमरावती विभागातील सर्वच विभागाच्या चमू उपस्थित होत्या. 17 वर्ष वयोगटात मुलांच्या चमू मध्ये



**टेनिक्वाईट स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंसोबत मुख्याध्यापक श्रीनिवास जोशी व क्रीडा शिक्षक विवेक गहाणकरी**

जे.डी.चवरे विद्यामंदिरची चमू अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करत होती.

17 वर्ष मुलांच्या वयोगटात कर्णधार नैतिक लिलाधर वर्मा, उत्कर्ष दिलीप पुणेवार, रूत्विक पवन रोडे, सौम्य मंगेश सरोदे, स्वरूप राहुल एक्कलवार या खेळाडुंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. सर्व खेळाडू लोकमान्य व्यायाम शाळेच्या प्रांगणावर नियमीत सराव करतात. या चमूने लातुर, पुणे, कोल्हापुर या विभागाना मात देवून अटीतटीच्या अंतिम सामन्यात नागपुर विभागासोबत 16 विरूध्द 21 या अंकाने विजय प्राप्त केला.

यशस्वी खेळाडूंना शा. शिक्षक विवेक गहाणकरी व राज्य प्रशिक्षक अक्षय गवारे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वितांचे शाळेचे व्यवस्थापक मंडळ, शाळा समिती अध्यक्ष डॉ. सौ लिनाताई चवरे,मुख्याध्यापक श्रीनिवास जोशी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. खेळाडूंनी मिळवलेल्या या यशाबददल वाशीम जिल्हा क्रीडा कार्यालयाचे जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोडें, तालुका क्रीडा अधिकारी श्रीमती मंगला शेंडे, लोकमान्य व्यायाम शाळेचे पदाधिकारी आनंद पेंटे, वाशीम जिल्हा टेनिक्वाईट संघटनेचे अध्यक्ष तथा पदाधिकारी यांनी कौतुक केले.

# लाडखेड मंडळ सर्कलमध्ये अवैद्य गौण खनिज उत्खलन जोरात

### मंडळअधिकारी, तलाठी यांचे रेती-तस्करी सोबत कनेक्शन

महाराष्ट्र जीत

**प्रशांत ठाणे / दारव्हा..**लाडखेड महसूल मंडळामध्ये मोठ्या प्रमाणात अवैद्य उत्खलन होत असून होणाऱ्या अवैद्य उत्खननाला पाथ्रड देवी तलाठी आणि मंडळ अधिकारी यांची मुखसंमती असून लाडखेड मंडळ मध्ये सावळा सावंगी वडगाव गाढवे पाथ्रड देवी यासह अनेक नद्यांचा समावेश असून या नद्यांमधून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा दिवसाढवळ्या अगदी राजसेसपने केल्या जात असून एकूणच या सर्व प्रकाराला ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांचे अर्थपूर्ण मूक संमती असल्याने रेती उपचार करण्याचा कुठल्याही वाहनावर सण २०२१ पासून आज पर्यंत कारवाई करण्यात आली नाही. मंडळ अधिकारी लाडखेड पाथ्रड देवी तलाठी यांनी रेती तस्करी यांच्या सोबत त्यांचे कनेक्शन असल्याने कोणतीही माहिती त्यांना देण्यात येतात. असेच मंडळ अधिकारी लाडखेड, पाथ्रड देवी तलाठी, यांच्या समोरून ट्रॅक्टर वाहने विना नंबर प्लेट ट्रॉली भरलेली दिसूनही तलाठी ही त्याच्यावर कारवाई न करता त्यांना पाठिंबा देण्यात येतात व नदीपात्रामध्ये दर दिवसाला प्रतिबंधित वाहने जात असून दिवसभर



नदीपात्रात मधून रेती गाळल्या जात असून दिवसभर रेती जमा करून रात्रभर ट्रक ट्रॅक्टर च्या साह्याने रेतीची वाहतूक केल्या जात असून मंडळ अधिकारी या गंभीर विषयाकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करीत असल्याने पर्यावरणाचा हास होत असून पर्यावरणाने पाणीटंचाईची समस्या निर्माण होत असल्याने याकडे तहसीलदार दारव्हा, उपविभागीय अधिकारी दारव्हा,जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी या गंभीर्याने विचार करून सदर प्रकरणाची मंडळ अधिकारी लाडखेड, पाथ्रड देवी तलाठी यांची सखोल चौकशी करून दोषीवर कारवाई करावी.अशी मागणी मंडळ सर्कलमधील नागरिक करीत आहे.

उपविभागीय अधिकारी दारव्हा, तहसीलदार दारव्हा यांनी भरारी पथकाची निर्मिती करून लाडखेड मंडळमध्ये अनेक नद्यांवर आपल्या कर्मचा-यामार्फत हालचालीवर लक्ष केंद्रित केल्यास दर दिवसाला किमान १० ते १५ ट्रॅक्टर रंगेहात सापडू शकतात त्यामुळे या गंभीर विषयाकडे उपविभागीय अधिकारी,तहसीलदार यांनी तात्काळ लक्ष घालून हा प्रकार बंद करावा अशी मागणी परिसरातील जनतेकडून केल्या जात आहे..

# भाजपा स्थापना दीना निमित्त ग्राम हिवरा येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

### भाजपा युवा मोर्चा अडोळी सर्कल चा उपक्रम

महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रविण पट्टेबहादुर) :** 6 एप्रिल रोजी भारतीय जनता पार्टी स्थापना दिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी तर्फे अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.त्याच अनुषंगाने भारतीय जनता युवा मोर्चा अडोळी सर्कल च्या वतीने ग्राम हिवरा गणपती येथे दिनांक 6 एप्रिल रोजी गणपती मंदिरा समोर,सकाळी 11.00 ते 2.00 यावेळेत या भव्य मोफत नेत्र तपासणी व मोफत मोदी बिंदू शस्त्रक्रिया या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरान द्वारा नेत्र तपासणी केली जाणार आहे, तपासणीनंतर आवश्यकता असलेल्या रुग्णांना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया दमानी नेत्र रुग्णालय अकोला द्वारा करून देण्यात येणार आहे. या शिबिराचा गरीब व गरजू रुग्णांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल.




युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष प्रदीप देशमुख यांचा मते सेवा,संघर्ष और बलिदान हेच भारतीय जनता युवा मोर्चाचे ब्रीदवाक्य राहिले आहे.जनतेचा सेवे साठी युवा मोर्चा कार्यकर्ते नेहमीच अग्रेसर असतात त्याच अनुषंगाने भाजपा स्थापना दीना निमित्त गरीब व गरजू रुग्णांन साठी या मोफत नेत्र तापासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आले आहे.या शिबिराला वाशिम मंगरूळनाथ मतदारसंघाचे आमदार शामभाऊ खोडे, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चीतलांगे व भारतीय जनता पार्टीचे अनेक पदाधिकारी सुद्धा उपस्थित राहणार आहेत.तरी परिसरातील रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय

### शहाण्याचा शहाणपणा की...

माणसाच्या आयुष्यात अशी वेळ येते; पण आपण रस्ता चुकलो असे प्रामाणिकपणे मान्यच न केल्यास चकवा लागल्याप्रमाणे गरगर फिरावे लागते...

'मी युद्ध जिंकलेले आहे' आणि 'मी युद्ध लवकरच जिंकेन', 'मला या युद्धात कोणाच्याही मदतीची गरज नाही' आणि 'मला जिंकण्यासाठी मदत न करणाऱ्यांस मी विसरणार नाही', 'इराण माझ्यासमोर क्षमायाचना करतो' आणि 'इराणला अजूनही क्षमायाचनेची गरज वाटत नाही', 'इराणची मारगिरी ताकद संपली आहे' आणि 'इराण अजूनही भेदक मारा करू शकतो', 'होर्मुझची सामुद्रधुनी मी इराणकडून सोडवल्याखेरीज स्वस्थ बसणार नाही' आणि 'होर्मुझची सामुद्रधुनी मुक्त करण्याचा आग्रह मी धरणार नाही', 'राजवट बदलाखेरीज इराणला मुक्ती नाही' आणि 'राजवट बदल ही आमची मागणी नाही' अशी पूर्णपणे परस्परविरोधी वक्तव्ये एकाच वेळी करणारे अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या वर्षीच्या हल्ल्यात ज्या इराणी अणुभट्ट्या 'नष्ट' केल्या त्या उद्ध्वस्त करण्यासाठी पुन्हा छेडलेल्या युद्धास एक महिना पूर्ण झाला. हे युद्ध दोन-चार आठवड्यांत संपवू असा विश्वास जाहीरपणे व्यक्त करणाऱ्या ट्रम्प यांना आता ते संपवण्यासाठी आणखी दोन-चार आठवडे हवे आहेत. तशी 'सुवार्ता' त्यांनी स्वत:च अमेरिकी देशबांधवांस आज दिली. वास्तविक ती देण्याआधी ३६ तास आपण अमेरिकी नागरिकांस विशेष संबोधन करणार आहोत या त्यांच्या घोषणेमुळे ट्रम्प आता काय बोलणार याकडे सारे जग कानात प्राण एकवटून लक्ष ठेवून होते. शहाण्यांची निराशा करण्याचा आपला परिपाठ ट्रम्प यांनी आजही सोडला नाही. आपल्या जेमतेम १८ मिनिटांच्या भाषणात त्यांनी गेले ३२ दिवस चाललेल्या युद्धाबाबत ना नवीन काही सांगितले, ना काही वेगळा मुद्दा मांडला. त्यामुळे त्यांच्या संबोधनानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाचे दर वाढले आणि भांडवली बाजाराने आपले घसरणे अव्याहत सुरूच ठेवले. तेव्हा त्यांच्या या विशेष संबोधनाचे नक्की प्रयोजन काय?

या प्रश्नाचे उत्तर या युद्धाचेच नक्की प्रयोजन काय या प्रश्नाच्या न मिळालेल्या उत्तरात आहे. जे युद्ध इराणमधील राजवट बदलासाठी लादले गेले त्या युद्धात राजवट बदल हा मुद्दा नाही, असे ट्रम्प म्हणतात. पण लगेच पुढे जाऊन 'अपेक्षित राजवट बदल झाला', असेही ते घोषित करतात. मग प्रश्न असा की हा राजवट बदल झाला असेल तर मग युद्ध सुरू ठेवण्याची गरजच काय? ही नवी (?) राजवट समंजस आहे, असेही प्रशस्तिपत्र ते देतात. आणि लगेच पुढे ते 'आम्हास अपेक्षित आहे ते झाले नाही तर इराणला आम्ही अश्मयुगात पाठवू' असा इशारा देण्यास मागेपुढे पाहत नाहीत. त्यांच्या मते 'इराणची जागा तेथेच आहे'. तसे असेल तर मुदलात अश्मयुगकालीन एका य:कश्चित देशाविरोधात महिन्याहून अधिक काळ रक्त आटवण्याची गरज जगातील या एकमेव महासत्तेस का वाटावी? जो देश, तेथील नागरिक मुळात अश्मयुगातच आहेत याची खात्री असताना ट्रम्प पुन्हा त्यांना त्याच अश्मयुगात कसे काय बरे पाठवणार? या युद्धात आपली फत्ते झाल्याचे त्यांनी सांगितले. ते छान. मग तरीही आणखी दोन-चार आठवडे त्यांना हे युद्ध संपवण्यास का हवेत? इराणी नेतृत्व दाती तृण धरून आपणास शरणागत आले आहे, असे ट्रम्प म्हणाले. हे तर फारच छान. पण हा त्यांचा आशावाद व्यक्त होण्यापूर्वी इराणने अमेरिकी तळ आणि इस्रायलवर बॉम्बफेक केली. ट्रम्प यांचे भाषण सुरू असताना बहारीन आदी पश्चिम आशियातील अमेरिकी बगलबच्च्यांस लक्ष्य केले. आणि भाषण संपल्यावर पुन्हा एकदा इस्रायलवर बॉम्बफेक करून इराणने अमेरिकी अध्यक्षांस मानवंदना दिली. हे सर्व काय दर्शवते?ट्रम्प कसे पूर्णपणे रस्ता चुकले आहेत याचेच दर्शन या उलटसुलट विधानांतून होते. सामान्य माणसाच्याही आयुष्यात अशी वेळ येते. अशा वेळी आपण रस्ता चुकलो असे प्रामाणिकपणे मान्य करणे आणि कोणा सज्जनास रास्त मार्ग विचारणे यातच शहाणपण असते. तसे न केल्यास चकवा लागल्याप्रमाणे गरगर फिरावे लागते आणि कालांतराने आपण होतो तेथेच आहोत हे लक्षात येते.

# पुण्यात शब्दवेल नारीशक्ती सन्मान सोहळा व राज्यस्तरीय कविसंमेलनाचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**पुणे (प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे) :** स्व. जिजाबाई प्रभाकरराव चरडे यांच्या स्मृतीस समर्पित "शब्दवेल नारीशक्ती सन्मान सोहळा व राज्यस्तरीय कविसंमेलन" रविवार दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९:४५ वाजता निर्माण अजिंक्यतारा सोसायटी, बी बिल्डिंग 1102, सिंहगड कॉलेजजवळ, राजगड मुलांचे वसतिगृह, वडगाव बुद्रुक, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्रतिभा सराफ असतील. कार्याध्यक्ष म्हणून अश्विनी अतकरे तर उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. मंदा नांदुरकर उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून युवा कादंबरीकार पुष्पराज गावंडे (माजी सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ), अक्षरक्रांती फाउंडेशनचे अध्यक्ष शंकर घोरसे तसेच बांधिलकी प्रतिष्ठान, अमरावतीच्या अध्यक्षा ॲड. डॉ. नीता कचवे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल चरडे करणार आहेत.

यावेळी देवेंद्र इंगळकर यांच्या "हलूल बेटावरून" तसेच सौ. नलिनी विजय पवार यांच्या "निसर्गछाया" या पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. तसेच निरंजन मार्कंडेयवार यांचा "मेमसाहब – स्त्री विषयक कवितांचा विशेष कार्यक्रम" आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना शब्दवेल नारीशक्ती सन्मान पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात येणार आहेत. साहित्य, शिक्षण, वैद्यकीय, सामाजिक, कला व ग्रामीण जनजागृती अशा विविध क्षेत्रातील राज्यभरातील मान्यवर महिलांचा सन्मान केला जाणार आहे. यामध्ये ॲड. डॉ. नीता कचवे (अमरावती), डॉ. ममता इंगोले (अकोला), डॉ. संगीता बनाईत (नागपूर), ज्योती मनोहर (पुणे), वैशाली पुंडले (पनवेल), क्रांती राणे पाटील (सातारा), मंजु वणवे वानखडे (अमरावती), अनुराधा धामोडे (पालघर), सुनंदा पाटील (मुंबई), कांताबाई सोनोने (यवतमाळ), सरोज




अंदनकर (नागपूर), डॉ. राणी चौधरी (अमरावती), पल्लवी उमरे (मुंबई), पल्लवी चिंचोळकर (मुंबई), अक्षता देशपांडे (पुणे), शारदा गणोरकर (अमरावती), डॉ. शुभांगी कुंभार (सातारा), जयमाला चव्हाण (सातारा), सोनाली नवले (अमरावती), मीना अशोक म्हसे (पुणे), पल्लवी वैद्य (अमरावती), रेखा साळुंखे (पुणे), रजनी ताजने (पालघर), सुषमा ढोले ठाकूर (डोंबिवली) व सीमा मंगेश घोगरे (पुणे) यांचा समावेश आहे.

यानंतर राज्यस्तरीय कविसंमेलन आयोजित करण्यात आले असून त्याच्या अध्यक्षस्थानी शीतल राऊत राहणार आहेत. ज्योती मनोहर व प्रवीण सोनोने सूत्रसंचालन करणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रमोद काकडे, आबासाहेब कडू, सुप्रसिद्ध व्याख्याते मधुकर वारभुवन तसेच सुप्रसिद्ध कवी दिवाकर देशमुख उपस्थित राहणार आहेत.

या कविसंमेलनात राज्यभरातील ४५ कवी-कवयित्री सहभागी होणार असून यामध्ये अविनाश चरडे, प्रा. महादेव लुले, दिपाली घाडगे, श्वेता बरकडे, कांचन सावंत, सचिन बेंडभर, विशाल खोंदले, सीमा नवले, अतुल दुधाने, गजानन माद्यस्वार, पल्लवी चिंचोळकर, षा मिसाळ, भावना देशपांडे, सुनंदा पाटील, अक्षता देशपांडे, भाग्यश्री खुटाळे, विनिता कदम, राहुल शेडगे, अस्मिता इनामदार, वैभवी माने अय्यर, शैलजा शिरवाडकर, डॉ. शुभांगी कुंभार, नरेंद्र व्यवहारे, माधवी मोतलिंग, रामदास गायधने, विलास पुंडले, यश इंगळे, अनुराधा धामोडे, मीनल कांबळे, अमोल फड, आरती झोटिंग, मनिषा बोटे, अर्चना उबाळे, श्रीधर अंभुरे, वृषाली चोरे, पौर्णिमा रणपिसे, डॉ. शलाका घाडगे, वृषाली वानखडे, निलेश खडके, कार्तिकी शेटे, संजय मेश्राम व हर्षा अकर्ते, आरती नागपुरे, शबाना मुल्ला, सरोज अंदनकर यांचा सहभाग राहणार आहे.

राज्यभरातील साहित्यिक, कवी-कवयित्री, सामाजिक कार्यकर्ते व साहित्यप्रेमींनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष प्रवीण बोपुलकर यांनी केले आहे.

## भाजपा पार्कसाईट मंडळ,श्री सेवा प्रतिष्ठान अनिल भाई निर्मळे आयोजित हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

महाराष्ट्र जीत

**घाटकोपर,(केतन भोज) :** भारतीय जनता पार्टी पार्कसाईट मंडळ,श्री सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने अनिल भाई निर्मळे ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष यांनी हनुमान जन्मोत्सवाचे आयोजन दिपक सेवा संघ भाजपा कार्यालय,जांभळी नाका ३८७ लास्ट स्टॉप पार्कसाईट विक्रोळी पश्चिम याठिकाणी केले होते.यावेळी या हनुमान जन्मोत्सव निमित्त सत्यनारायण महापूजा,हनुमान स्तुति,महाआरती तसेच हनुमान जन्म उत्सव व प्रसाद वितरण याशिवाय सुंदरकांड पाठ संगीत भजन,हनुमान चालीसा पाठ अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.श्री सेवा प्रतिष्ठान यांनी आयोजित केलेल्या या हनुमान जन्मोत्सव कार्यक्रमाला विविध राजकीय,सामाजिक स्तरातील मान्यवरांनी उपस्थित राहत दर्शनाचा लाभ घेतला.तसेच विशेष म्हणजे महापौर रितू तावडे, नगरसेवक



प्रविण भाई छेडा,मनपा एन विभाग प्रभाग समिती अध्यक्षा अश्विनी मते यांनी देखील या हनुमान जन्मोत्सव कार्यक्रमाला उपस्थित राहत दर्शनाचा लाभ घेतला.यावेळी अनिल भाई निर्मळे आणि संतोष गांजले यांच्या सोबतच भाजपा च्या असंख्य कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले. हा हनुमान जन्मोत्सव कार्यक्रम उत्साहात संपन्न होण्यासाठी संतोष गांजले मंडळ अध्यक्ष पार्कसाईट,महेश गुप्ता वॉर्ड अध्यक्ष,वकिल यादव, संदिप सिंग,शिवम मिश्रा,दत्ता सोनवणे,जय सावंत,शंकर मांडये,उमेश कोठवदे,सौ. बबीता चौव्हाण,सुधीर ढकोलिया,सौ. हेमा,आप्पा पालांडे अशा असंख्य भाजपा महिला-पुरुष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कठोर परिश्रम घेतले.

## धर्मवीर संभाजी मित्र मंडळाच्या वतीने हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न



महाराष्ट्र जीत

**घाटकोपर,(केतन भोज)**;धर्मवीर संभाजी मित्र मंडळ(रजि.) संचालित हनुमान जन्मोत्सव समितीच्या वतीने हनुमान जन्मोत्सवाचे हनुमान मंदिर,धर्मवीर संभाजी चौक, चिरागनगर,घाटकोपर(प) या ठिकाणी बुधवार १ एप्रिल ते २ एप्रिल या दिवशी हनुमान जन्मोत्सव आयोजन करण्यात आले होते.या वर्षी मंडळाचे ५७ वे वर्ष होते.दोन दिवसीय चालणाऱ्या हनुमान जन्मोत्सव सोहळ्यात लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.तसेच श्री कालभैरवनाथ प्रासादिक भजन मंडळाचा भजनाचा कार्यक्रम मोठ्या हर्ष उल्हासात संपन्न झाला.गायनाचार्य व घाटकोपर भूषण ह.भ.प तानाजी महाराज तांबारे,अशोक महाराज पाचपिल्ले,श्याम महाराज दिघे,मिलिंद काळे,संभाजी पवार,बन्सी ढेरे,बाबू तांबुटकर यांची मोलाची साथ लाभली.या महाप्रसादासाठी विभागीय महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.धर्मवीर संभाजी मित्र मंडळ हे सांस्कृतिक,सामाजिक शैक्षणिक,कला,क्रिडा मध्ये नेहमीच सक्रिय असते.

## नीमसाखर गावामध्ये श्री स्वामी समर्थ महाराजांची चैत्र .पौर्णिमा अति उत्सवात साजरी




महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप :** निमसाखर गावामध्ये श्री स्वामी समर्थ महाराजांची चैत्र पौर्णिमा अति उत्साहात साजरी करण्यात आली श्री स्वामींची ग्राम प्रदक्षिणा काढण्यात आली तसेच हरिभक्त परायण श्री नागनाथ महाराज क्षिरसागर पंढरपूर यांचे प्रवचन सेवा झाली नंतर श्री स्वामींचा आरती व जप घेण्यात आला नंतर सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद देण्यात आला महाप्रसादाचे अन्नदाते श्री लहू पांडुरंग दरेकर यांच्यातर्फे देण्यात आला तसेच नेहमीप्रमाणे पालखीची फुलांची सजावट श्री राजेंद्र मारुती घोडे यांनी केली तसेच मंदिरातील रांगोळीची सेवा सौ शितल सुनील टकले यांनी केली. मंदिरामध्ये श्री विनोद हनुमंत चव्हाण यांचा भजनाचा कार्यक्रम झाला त्यांना साथ महादेव भजनी मंडळाने दिली. या कार्यक्रमाला गावातील सर्व स्वामीभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देगलूरमध्ये आयपीएल सामन्यांवर सट्टा; कोट्यवधींची उलाढाल

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने :** देगलूर शहरात आयपीएल हंगाम सुरू होताच ऑनलाइन सट्टेबाजाराने भीषण रूप धारण केले असून, संपूर्ण शहरात जुगाराचे जाळे वेगाने पसरत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. गल्लीबोळापासून ते शाळा व महाविद्यालयांपर्यंत सट्ट्याची लागण पोहोचली असून, तरुणाई मोठ्या प्रमाणात या विळख्यात अडकत चालली आहे. मोबाईल ॲप्स, क्रोम व गुगलच्या माध्यमातून आयडी तयार करून सट्टा खेळवला जात असून, यासाठी १० ते १५ हजार रुपयांची अमानत रक्कम घेऊन युजरनेम व पासवर्ड दिला जातो. त्यानंतर लाखो रुपयांचा सट्टा एका सामन्यावर लावला जात असून, दररोज कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याची



चर्चा आहे.

या सट्टा व्यवहारामुळे अनेक युवक कर्जबाजारी होत असून, नैराश्याच्या गर्तेत अडकत आहेत. कमी वेळात जास्त पैसे कमावण्याच्या मोहापायी अनेकांनी आपले आयुष्यच उद्ध्वस्त करून घेतले असून, देशपांडे गल्लीतील एका तरुणाने सट्ट्याच्या विळख्यात अडकून आत्महत्या केल्याची घटना अजूनही ताजी आहे. विशेष म्हणजे, शाळकरी मुलांमध्येही सट्टा खेळण्याची प्रवृत्ती वाढत असून, हा प्रकार आता फॅशन बनत चालल्याने पालक वर्गात प्रचंड चिंता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, देगाव नाका परिसरातील तथाकथित 'टी कंपनी' हे या सट्टा रॅकेटचे मुख्य केंद्र बनल्याची चर्चा असून, एका स्वयंघोषित मास्टरमाईंडच्या इशाऱ्यावर संपूर्ण व्यवहार चालत असल्याची माहिती समोर येत आहे. सीमेलगतच्या तेलंगणा, कर्नाटक आदी राज्यांतून एजंट (फंटर) नेमून हे जाळे अधिक मजबूत करण्यात आले असल्याचेही बोलले जात आहे. या सट्ट्यात काही प्रभावशाली व्यक्ती व राजकीय वरदहस्त असलेल्या लोकांचा सहभाग असल्याची कुजबुज नागरिकांमध्ये सुरू आहे.

सर्वात गंभीर बाब म्हणजे या सर्व प्रकारांची माहिती पोलीस यंत्रणेला असूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. "ही निष्क्रियता की संगनमत?" असा थेट सवाल आता उपस्थित केला जात असून, या सट्टा रॅकेटमागील मास्टरमाईंडवर कठोर कारवाई करून त्याला तडीपार करावे तसेच संगनमत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. डीआयजी शहाजी उमाप व एसपी अबिनाश कुमार यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ छापेमारी करून ऑनलाइन व ऑफलाइन सट्टा पूर्णपणे बंद करावा, अशी एकमुखी मागणी पुढे येत आहे.आयपीएलच्या नावाखाली सुरू असलेले हे सट्टाराज आता केवळ बेकायदेशीर व्यवहार न राहता समाजासाठी धोक्याची घंटा ठरत असून, जर वेळेत कठोर पावले उचलली नाहीत तर आणखी किती युवक या विळख्यात सापडतील, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत चळवळीसाठी समर्पित राहणार : प्रा. जोगेंद्र कवाडे सर

## ‘पीरिपा’तर्फे राज्यात ‘संघर्ष दिन’ उत्साहात साजरा

महाराष्ट्र जीत

देशाला स्वातंत्र्य मिळून 77 वर्षे उलटली तरी लोकशाहीचा केंद्रबिंदू असलेला मोठा वर्ग जो महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली चळवळ घेऊन चालत आहे आणि मी त्याच वर्गातील एक सामान्य कार्यकर्ता असे स्वताला समजतो. देशातील प्रत्येक घटकातील शेवटच्या व्यक्तीला समानतेचा अधिकार मिळवून देण्याचे मोलाचे कार्य संविधानाने केले आहे. त्याच संविधानाच्या चौकटीत राहुन मी आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत चळवळीसाठी समर्पित राहणार असे प्रतिपादन लॉंग मार्च प्रणेते व पीरिपाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे सर यांनी केले आहे. मंगळवारी सायंकाळी नागपुरातील आनंद नगरातील पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या केंद्रिय कार्यालयात प्रा. जोगेंद्र कवाडे सर यांचा वाढदिवस संघर्ष दिन म्हणून साजरा करण्यात आले. भव्य सत्कार सोहळयात पीपल्स रिपब्लिकन पार्टी चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तसेच महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप भाई कवाडे यांच्या हस्ते प्रा. कवाडे सरांना शॉल व पुष्पहार देउन सत्कार करण्यात आले. याप्रसंगी सौ. प्रतिमाताई ज. कवाडे, महाराष्ट्र प्रदेश संघटक कपिल लिंगायत, प्रदेश उपाध्यक्ष मृणाल गोस्वामी, विदर्भ अध्यक्ष विजय पाटिल,शहर अध्यक्ष कैलाश बोम्बले, नागपुर ग्रामीण जिल्हाध्यक्ष नरेंद्र डोंगरे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सविता ताई





नारनवरे, नागपुर शहर कार्याध्यक्ष संजय सूर्यवंशी यांच्यासह विदर्भ व जिल्हयातील कार्यकर्ते मोठया प्रमाणात उपस्थित होते.

याप्रसंगी कार्यकर्त्यांना संबोधित करताना प्रा. जोगेंद्र कवाडे सर म्हणाले की, प्रत्येक क्षण शोषित, वंचित व उपेक्षितांसाठी समर्पित करण्याचे आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देशात जातीपातीचे राजकारण करून समाजात विश पसरविण्याचे काम विरोधकांकडून होत आहे. इतिहासाची मोडतोड करून नवा वाद उभाकरून दंगलीचे विष कालविण्याचे काम होत आहे. यामुळे देशाची सोहार्दतेला खिळ बसविण्याचे काम होत आहे. त्यामुळे मानवी मूल्याचे वाटोळे झाले आहे. ही समाज व्यवस्था बदलण्याचा आपला प्रयत्न आहे, त्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत माझा संघर्ष हा सुरू राहणार, असे प्रतिपादन लॉंग मार्च प्रणेते व पीरिपाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे सर यांनी केले आहे.

नामांतर लढा अविरत संघर्षाचे प्रतिक

आज महाविकास आघाडीत असलेले कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने नेहमीच आंबेडकरी चळवळीला खिंडार पाडण्याचे काम केले. या दोन्ही पक्षा मुळेच आम्हाला सोळा वर्षांच्या प्रदीर्घ संघर्ष करावा लागला त्यानंतर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरणाची घोषणा करण्यात आली. अविरत संघर्षामुळेच विद्यापीठाच्या प्रवेश द्वारावर आपल्याला निळा टिळा लावता आला. तो आपल्या आयुष्यातील परमोच्च आनंदाचा क्षण होता. या आंदोलनात माझ्यासोबत भाजपचे गोपीनाथ मुंडे व गंगाधरराव फडणवीस हे देखील तुरुंगात गेले होते. त्यावेळी भाजपाला आंदोलन हे किती महत्त्वाचे आहे याची जाण होती. परंतु, खंत एव्हढीच की आपल्याला बाबासाहेबांच्या विचारांचे पक्ष चालविण्याचे ढोंग करणारे कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आजही जातीपातीचे राजकारण करून समुदायाला भरकटविण्याचे काम करीत आहे. भीम सैनिकांचा संघर्ष करण्यासाठीच या दोन्ही पक्षांनी पक्ष व संघटनांना उपेक्षित ठेवण्याचे काम केले. परंतु, आता आंबेडकरवादी जनतेला यांच्या कारभाराची जाण आहे. त्यामुळेच गत निवडणुकीत महायुतीवर विश्वास प्रत्येक समाजाने ठेवला आणि पुन्हा सत्ता महायुतीला मिळाल्याचेही प्रा. जोगेंद्र कवाडे सर यावेळी म्हणाले.

विविध पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिल्या शुभेच्छा

यावेळी पीपल्स रिपब्लिकन पार्टीसह विविध पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रा. कवाडे सरांना शुभेच्छा दिल्या. पीरिपातर्फे ‘संघर्ष दिना’चे औचित्य साधून पीपल्स रिपब्लिकन पार्टी, रिपब्लिकन युथ फोर्स, रमाई महिला ब्रिगेड, दलित मुक्ती सेना, राष्ट्रीय मजदूर सेना, राष्ट्रीय विद्यार्थी सेने तर्फे शहरातील विविध ठिकाणी सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजय पाटिल, अजय चव्हाण, नरेंद्र डोंगरे, पलाश ठवरे, रत्नाकर मडके, अरुण वाहणे, सुनीताताई शेंडे, सुचिता कोटांगळे, संजय खांडेकर, प्रा. गोपीचंद ढोके, दिलीप पाटील, सोहेल खान, स्वप्नील महल्ले, प्रकाश मेश्राम, शैलेंद्र (बापू) भोंगाडे, मुरलीधर मूरारकर, हिमांशू मेंढे, संजय बडोदेकर, सुमित डोंगरे, भीमराव कळमकर, प्रज्योत कांबळे, स्वप्नील वाडीभस्मे, अंकित ठवरे, कौस्तुभ चौधरी आणि समस्त पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# SC आरक्षणात ‘कोटा अंतर्गत कोटा’ची मागणी पेटली; मांग (मातंग) समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाची जोरदार हाक

## सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयानंतर राज्यात हालचाली वेगवान

### दुर्लक्षित घटकांना न्याय देण्यासाठी तातडीने निर्णयाची मागणी

महाराष्ट्र जीत

**लखन लोंढे/महागांव** : राज्यातील अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत जातीय वर्गीकरण करून मांग (मातंग) समाजासाठी स्वतंत्र आरक्षण लागू करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. सामाजिक कार्यकर्ता तथा पत्रकार लखन रामराव लोंढे यांनी मुख्यमंत्री यांना याबाबत सविस्तर निवेदन सादर करत शासनाने तात्काळ निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी केली आहे.

लोंढे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, संविधानाने अनुसूचित जातींसाठी आरक्षणाची तरतूद केली असली तरी प्रत्यक्षात काही मोजक्याच जातींना त्याचा मोठ्या प्रमाणावर लाभ मिळत आहे. याउलट मांग (मातंग) समाज शिक्षण, नोकरी, प्रशासन आणि इतर विकासाच्या संधींपासून मोठ्या प्रमाणात वंचित राहिल्याने या समाजामध्ये तीव्र नाराजी पसरलेली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय ठरतोय टर्निंग पॉइंट

दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निर्णयामुळे या मागणीला नवे बळ मिळाले आहे. या निर्णयानुसार अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) आरक्षणामध्ये उप-वर्गीकरण (Sub-classification) करण्यास राज्य सरकारांना परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे आता राज्यांना “कोटा अंतर्गत कोटा” लागू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आकडेवारी सांगते असमानता स्पष्ट

२०११ च्या जनगणनेतील आकडेवारीनुसार राज्यातील अनुसूचित जातींचा वाटा सुमारे ११.४५ टक्के आहे. या प्रवर्गामध्ये सुमारे ५९ जातींचा समावेश असून त्यामध्ये मोठी विषमता दिसून येते.

१) महार समाज – सुमारे ६२.२%

२) मांग (मातंग) समाज – सुमारे १९.२%

३) चांभार समाज – सुमारे १०.९%

या आकडेवारीवरून आरक्षणाच्या लाभामध्ये असमतोल असल्याचे स्पष्ट होत असल्याचा दावा लोंढे यांनी केला आहे.

तज्ञ समिती स्थापन करण्याची मागणी

लोंढे यांनी शासनाकडे मागणी करताना म्हटले आहे की, अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत वर्गीकरण करण्यासाठी तज्ञ समिती अथवा अभ्यास गट स्थापन करावा. या समितीमार्फत सर्वसमावेशक अभ्यास करून सर्वाधिक मागासलेल्या घटकांना न्याय देणारी स्वतंत्र आरक्षणाची अंमलबजावणी करावी.

आंदोलनाचा इशारा

शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल न घेतल्यास राज्यातील मांग (मातंग) समाज लोकशाही मार्गाने आंदोलन उभारण्यास बाध्य होईल, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे आगामी काळात हा मुद्दा राज्यातील सामाजिक व राजकीय पातळीवर मोठा चर्चेचा विषय ठरण्याची शक्यता आहे.

राज्य सरकारची भूमिका काय?

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य सरकार याबाबत कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सामाजिक न्यायाच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा ठरू शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे.

---

# खंडाळा खुर्द येथे भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीस सहकार्य करा

### खंडाळा खुर्द येथील ग्रामस्थांची आझाद समाज पार्टीचे विदर्भ अध्यक्ष उमेश हिवराळे यांच्याकडे मागणी

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** येथून जवळच असलेल्या ग्राम खंडाळा खुर्द येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती काढण्यासाठी अडचणी येत असते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती 14 एप्रिल रोजी संपूर्ण भारतभर मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी गावातून मिरवणूक काढून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करतात.त्यामुळे आमच्या गावात सुद्धा मिरवणूक काढण्याची ठरले आहे.काही वर्षांपूर्वी मिरवणुकीची संपूर्ण तयारी केलेली असताना पोलिसांनी गावातील मिरवणूक न काढून जागेवर शांततेने जयंती साजरी करा असे सांगून मिरवणूक काढू दिली नाही.त्यामुळे यावर्षी आमच्या गावांमध्ये मिरवणूक काढण्याकरिता आपण पुढाकार घेतल्यास आमच्या गावात निश्चितच मिरवणूक यशस्वी होईल.याची आम्हाला शाश्वती आहे.कारण यापूर्वी आपण वाशिम



जिल्ह्यात मिरवणूक असो अथवा समाजावरील न्याय त्याच्या रसो आपण पुढाकार घेतल्यानंतर समाजाला न्याय मिळालेला आहे ल.याची कल्पना आम्हाला असल्यामुळे आपण आमच्या गावातील मिरवणूक काढण्यासाठी सहकार्य करावे अशी मागणी खंडाळा खुर्द येथील धम्म बांधवांनी आझाद समाज पार्टीचे विदर्भ अध्यक्ष उमेश हिवराळे यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

---

# शिवसेना अल्पसंख्यांक पश्चिम विदर्भ समन्वयक पदी जावेद परवेज यांची नियुक्ती



महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रतिनिधी) :** शिवसेनेचे मुख्य नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने विधान परिषद आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या नेतृत्वात जावेद परवेज यांची शिवसेना अल्पसंख्यांक पश्चिम विदर्भ समन्वय पदी निवड निवड करण्यात आली आहे. विधानपरिषद आमदार भावनाताई गवळी यांनी नियुक्तीपत्र देऊन त्यांची नियुक्ती केली. वंदनीय हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा आपण सक्रियपणे प्रचार आणि प्रसार कराल तसेच समाजातील विविध घटकांसोबत प्रश्न सोडवण्यासाठी आपली मदत होईल आणि शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन समन्वय साधन असा विश्वास देखील विधानपरिषद आमदार भावनाताई गवळी यांनी नियुक्तीपत्र देत असताना व्यक्त केला आहे.जावेद परवेज यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी उपस्थित नागेश घोपे,विजय बोरकर,पंकज इंगोले अनिल गरकळ, लक्ष्मणराव गावंडे,डूबे पाटील,गजानन घुले,मदन चौधरी, सौरभ सपकाळ, सुमित गोटे,मोहन कोल्हे,प्रविण पट्टेबहादूर, यांच्यासह अनेक जण मोठ्या संख्येने उपस्थित होते.


---

# प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून होणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या डांबरीकरण रस्त्याच्या विरोधात घानवळगावचे नागरिक एकवटले

महाराष्ट्र जीत

**मोखाडा अमोल टोपले :** सध्या ग्रामीण भागाच्या विकासाच्याअनुषंगाने प्रशासन ग्रामीण भागात वाहतूक व दळणवळणासारख्या भौतिक सुविधांवर विशेष लक्ष देत आहे.खेडे अर्थात ग्रामीण भागातील रस्ते वाहतूक ही एक प्रकारे देशाच्या विकासाचा कणा समजला जातो.

याच विकासाच्या दृष्टीकोनातून प्रामुख्याने मोखाड्यासारख्या आदिवासी बहुल आणि दुर्गम भागात दर्जेदार रस्ते बनवण्यासाठी जिल्ह्याचे पालघर येथील प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे कार्यालय विशेष लक्ष ठेवून असते. याच पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मोखाडा तालुक्यातील मोरचोंडी ते बलद्याचापाडा असा सुमारे 11 कि.मी. चा रस्ता मंजूर झाला असून त्यापैकी मोरचोंडी ते पिंपळपाड्यापर्यंतचा डांबरीकरण रस्ता गेल्या पावसाळ्यापर्यंत झाला होता. तेव्हाच घानवळ ते पिंपळपाडा हा रस्ता डांबरीकरण होणे अपेक्षित असताना पावसाच्या कारणास्तव तो बनवणे पुढे ढकलण्यात आले होते .याच दरम्यान



रस्त्याच्या प्रचंड दुरावास्थेमुळे बससेवा वारंवार खंडित होत होती.

सार्वजनिक बससेवा खंडित झाल्यामुळे घानवळ, जांभूळमाथा,बलद्याचापाडा,रुईपाडा येथील अबाल - वृद्ध, रुग्ण, विद्यार्थी अशा हजारो नागरिकांना पिंपळपाडा येथे बस प्रवासासाठी तीन ते सहा कि.मी. ची पायपीट करावी लागत असल्याने त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता.याच दरम्यान गावातील तरुण या दुरावस्था झालेल्या रस्त्यावरील धोकादायक खड्डे बुजवून सार्वजनिक बससेवा सुरळीत करण्याचा प्रयत्न करत होते.प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मंजूर झालेला रस्ता डांबरीकरण होईल आणि बससेवा सुरळीत अशी आशा समस्त नागरिकांमध्ये निर्माण झाली होती.मंजूर रस्त्याच्या अनुषंगाने जिजाऊ कन्स्ट्रक्शन यांनी सप्टेंबर 2025 च्या शेवटी पिंपळपाडा ते घानवळ हा रस्ता बनवायला सुरुवात केली. तेव्हापासून आतापर्यंत जवळपास पाच महिने उलटून देखील रस्ता व्यवस्थितरित्या डांबरीकरण बनवला गेला नाही. या दरम्यान सार्वजनिक बसव्यवस्था देखील खंडित झाली आहे. त्यामुळे नागरिकांना गैरशाहीचा प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे हा रस्ता पालघर - नाशिक जिल्ह्याला जोडणारा कमी अंतराचा रस्ता असून गुजरातराज्याची सीमा देखील खुप जवळ आहे. अशा या दुर्गम- डोंगराळ भौगोलिक परिस्थितीच्या अनुषंगाने हा रस्ता अत्यंत महत्वाचा आहे.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मंजूर डांबरीकरण रस्ता जिजाऊ कन्स्ट्रक्शन कंपनीच्या ठेकेदाराने अतिशय दर्जेदार करणे अपेक्षित असताना सदर रस्ता अत्यंत निकृष्ट दर्जाचा बनवला जात असून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे रस्ता बनवण्याचे निकष पूर्ण करत नाहीत असा आरोप घानवळ गावचे दक्ष नागरिक सातत्याने करत आहेत.या रस्त्याच्या अत्यंत निकृष्ट दर्जाबाबत नागरिकांनी ठेकेदार,रस्त्याचे अभियंते आणि पर्यवेक्षक यांच्याविरोधात एकवटले असून त्यांनी संताप व्यक्त केला आहे. घानवळ गावच्या दक्ष नागरिकांनी रस्त्यावर प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी उपस्थित राहून त्यांना जाब विचारला आहे.या प्रसंगी घानवळ गावचे ग्रुप ग्रामपंचायत सदस्य- भास्कर कोरडे यांच्या समवेत गंगूबाई खरपडे, नामदेव वारघडे, संजय तरे, सखाराम पिठोले,बाळू पिठोले, चंदर लाखन,जयराम फसाळे,अक्षय दापट,कैलास तरे,शरद तरे,हिरामण वळवी,नामदेव खरपडे, हिरामण खरपडे,प्रल्हाद कांदडे,जगदीश कांदडे,दयानंद पाटेकर, संदेश वळवी इत्यादी दक्ष नागरिकांनी कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन उपस्थिती दर्शवली होती.

# काजळेश्वर येथे अवकाळी पावसामुळे आंबे टरबुज गोबी यांचे प्रचन्ड नुकसान

महाराष्ट्र जीत

**माहादेव जाधव :** काजळेश्वर येथे अवकाळी पावसामुळे फळबागाचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे शुक्रवारी दुपारी झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबे टरबुज गोबी याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले रघु संदिप उपाध्ये याचे आब्याच्या झाडावर विज कोसळयाने खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे आंबे वादळी वाऱ्यामुळे माती मोल झाले आहे तर काजळेश्वर येथील टरबुज शेतकरी ओमा वानखडे केशव उपाध्ये साजन डाहने मनोज महल्ले हर्शल उपाध्ये शिवा ऊपाध्ये तुसार ऊपाध्ये या युवा शेतकरी यानी फळबाग कडे वळले पण त्याना काय माहित कि निसर्ग ही त्या शेतकरी वर कोपनार या वादळी वाऱ्यासह पावसाने त्याच्या टरबुज या पीकाला माती मोल केले त्यात ईरान इस्राएल युद्धा मुळे



पावसातुन ऊरलेल्या टरबुज ला भाव नाही यात टरबुज शेतकरी याचा माल दोन ते तीन रू किलो नी व्यापारी मगत असल्याने या शेतकऱ्यांना लाखो रू घाटा सहन करावा लागत आहे युवा गोबी लागवड करनारे यासीर खा जमीर खा यानी दोन येकर गोबी लागवड केली आता ती गोबी मार्केट मध्ये जायला तयार होताच अवकाली पावसामुळे पुर्ण दोन ऐकराची गोबी खराब झाली आहे दोन ऐकर गोबीच नुकसान दोन ते अडीच लाखाच्या घरात आहे आता या युवा शेतकरी याशीर खा जमीर खा याचा समोर पुडच्या हंगामात शेती साठी लागनारा खर्च कशा करायचा हा खुप मोठा प्रश्न निर्माण झाला आहे या शेतकरी याची शेतीचा पंचनामा करून भरीव मदत करावी असे काजळेश्वर चे शेतकरी मागनी करीत आहे

# विद्यारंभ स्कूलमध्ये प्री-प्रायमरी ग्रॅज्युएशन डे उत्साहात साजरा

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाड:** कारंजा लाड येथील विद्यारंभ स्कूलमध्ये प्री-प्रायमरी विद्यार्थ्यांचा ग्रॅज्युएशन डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला महेंद्र धनस्कर सर शिक्षक जे.डी.चवरे विद्यामंदिर कारंजा ;शाळेचे अध्यक्ष सुनील झंवर, सचिव सौ. अंजली झंवर, व्यवस्थापक कु. रोशनी तळेकार, समन्वयक श्री. दिनेश फंदे इत्यादींची प्रमुख उपस्थीती होती .

दीपप्रज्वलनानेकार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. गाणी, नृत्य, नाटिका आणि आकर्षक पोषाख परिधान केल्याने कार्यक्रमाला रंगत आली.

विद्यार्थ्यांना ग्रॅज्युएशन कॅप परिधान करून प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात




आले. लहानग्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह पाहण्यासारखा होता. पालकांनीही आपल्या मुलांच्या यशाचा अभिमान व्यक्त केला.मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे सांगितले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. हा ग्रॅज्युएशन डे विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीकांत पवार व रिझवाना नौरंगाबादी यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रीती असलमोल,पल्लवी गावंडे,धनश्री नायसे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# वाशिम येथे उद्या गावागावातून महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

## सैनिक शेतकरी विल्फेअर फाउंडेशनच्या वतीने वाशिम येथे महिलांचा भव्य स्वयंरोजगार मेळावा आयोजित

सैनिक शेतकरी

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी) :** स्थानिक येथे दिनांक पाच एप्रिल रविवार रोजी सकाळी 11 वाजता वाटाणे लॉन येथे सैनिक शेतकरी वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने महिलांचा स्वयरोजगार भव्य उद्घाटन सोहळा आयोजित केला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष मनोज कुमार डांगे हे राहणार आहेत.तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष निलेश निकम महाराष्ट्र राज्य सचिव संजय सतई हे राहणार आहेत.तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाप्रमुख ओमप्रकाश फड,महिला जिल्हाध्यक्ष प्रीतीताई खडसे या राहणार आहेत तर प्रमुख मान्यवरांची उपस्थिती म्हणून तालुका अध्यक्ष गोपाल लव्हाळे,महिला तालुकाध्यक्ष वनमालाताई ढगे, मालेगांव तालुकाध्यक्ष धम्मपाल इंगळे, मालेगांव महिला तालुकाध्यक्ष लता गायकवाड ह्या राहणार आहेत.यावेळी या उद्घाटन सोहळ्या दरम्यान प्रमुख मार्गदर्शक आगामी काळामध्ये सैनिक शेतकरी वेल्फर फाउंडेशनच्या माध्यमातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजना तसेच विविध लाभ ग्रामीण भागातील महिला कुटुंबांना देण्यासाठी तसेच महिलांना सर्व रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत.म्हणून या ऐतिहासिक अशा भव्य महिला स्वयंरोजगार मेळावा उद्घाटन सोहळयाला जिल्ह्यातील गावागावातील महिलांनी मोठ्या संख्येने संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विभागप्रमुख सौ छायाताई पवार,किसन काळे,प्रवीण पट्टेबहादूर,स्वातीताई भिमटे जगन कापसे आशाताई देशमुख, नितीन ठाकरे भागीरथीताई कव्हर अमोल गायकवाड, सोनालीताई सरकटे ,अरविंद कांबळे प्रमिलाताई पखाले अभिषेक ढगे, आकांक्षाताई दूधमल,आरती ठोके,पायलताई गायकवाड,सचिन काळमुंदळे, अर्चनाताई टाले अश्विनीताई गायकवाड अतिश ठाकूर प्रशांत पंडित, मंगेश सावळे यांनी केले आहे.

# आरोग्य यंत्रणा तसेच लोकसहभागातून अधिक सशक्त व निरोगी महाराष्ट्र घडवूया – मंत्री प्रकाश आबिटकर

महाराष्ट्र जीत

**नागपूर :** राज्याच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून नागरिकांना मोफत आरोग्य सेवा देण्यात येत आहेत. आरोग्य सुविधा गावपातळीपर्यंत भक्कम करण्यावर भर देण्यात येत आहे. सर्वसामान्यांसाठीच्या मोलाच्या योजनांची माहिती तळागळापर्यंत पोहोचणे आवश्यक असून या योजना यशस्वी करण्यासाठी लोकसहभागाची चळवळ पुढे आले पाहिजे. आरोग्य यंत्रणा तसेच लोकसहभागातून अधिक सशक्त व निरोगी महाराष्ट्र घडवूया, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज येथे केले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था अर्थात एम्स येथील सभागृहात आयोजित 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव-२ ई. रविंद्रन, आरोग्य सेवा तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कांदेवाड आदी उपस्थित होते.

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे केवळ अभियान नसून ती एक व्यापक लोकचळवळ बनावी आणि लोकसहभागातून राज्यभर आरोग्याचा जागर व्हावा हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या अभियानात उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे, ग्रामीण भागातील नागरिकांच्या सामूहिक वर्तणुकीत बदल घडविणे आणि आरोग्यदायी जीवनशैली रुजविण्यावर या मोहिमेत भर देण्यात आल्यामुळे लोकसहभागाच्या माध्यमातून आरोग्य संपन्न गाव करण्यावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या अभियानामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा व तालुका यंत्रणा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे व या ठिकाणी कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यसेवक, सेविका व आशा तसेच ग्रामस्थांचा सक्रीय सहभाग महत्वपूर्ण ठरणार आहे. एकात्मिक कार्यप्रणाली व पारदर्शक मूल्यांकन प्रणालीच्या आधारे, या अभियानातून गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना "आरोग्य संपन्न ग्राम" म्हणून मानांकन व प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येणार आहे, आरोग्य समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासोबतच हे अभियान यशस्वी करण्यासाठी उत्स्फूर्तपणे पुढे यावे, असेही श्री. आबिटकर म्हणाले.

वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल म्हणाले की, ग्रामीण भागात आरोग्याविषयक उपक्रम राबविणे गरजेचे होते. या अनुषंगाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शालेय शिक्षणात आरोग्याचा धडा देणे गरजेचे आहे. सर्वांनी आपले कर्तव्य ओळखून काम केले पाहिजे. सर्वांनी आरोग्याची काळजी घेणे खूप महत्त्वाचे आहे. त्यापेक्षा काहीही मोठे नाही. स्वच्छता महत्वाची असून प्रत्येकाने जबाबदार नागरिक म्हणून काम केले पाहिजे, असे ते यावेळी म्हणाले.

सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक यांनी 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाविषयी माहिती दिली.

# महादेवी बारस निमित्त देवनीत जंगी कुस्ती स्पर्धा; विजेत्या पैलवानांचा सत्कार

महाराष्ट्र जीत

**देवणी तालुका प्रतिनिधी :** महादेवी बारस, शिवपार्व ती विवाह सोहळा व महादेव यात्रेनिमित्त देवनी शहरात जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दुपारी दोन वाजल्यानंतर कुस्त्यांना प्रारंभ झाला. विविध गटांतील कुस्त्यांमध्ये पैलवानांनी दमदार कामगिरी करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. स्पर्धेत रमेश बिरादार तसेच नागेश येडडे यांनी विजय मिळवत प्रत्येकी ₹५,००० चे बक्षीस जिंकले. तर हनुमंत केळगिरे यांनी ₹३,००० चे बक्षीस पटकावत तिघांनी देवनी शहराचे नाव उज्ज्वल केले.

स्पर्धेतील अंतिम व आकर्षक कुस्ती ₹११,००० बक्षीसाची ठेवण्यात आली होती. हे बक्षीस देवनीचे माजी सरपंच देविदास पतंगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तसेच विजेत्यांना चांदीची गदा दत्ता तपसाळे व दिनेश तपसाळे यांच्याकडून देण्यात आली. अंतिम कुस्तीचे विजेते प्रसाद शिंदे (रा. सावरगाव, जि. लातूर) यांचा शाल, श्रीफळ व चांदीची गदा देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच यात्रा कमिटीच्या वतीने महादेव मंदिरातही त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. संजय घोरपडे, उपनगराध्यक्ष अमित



मानकरी, बालाजी वळसांगवीकर, नगरसेवक नदीम मिर्झा, महादेव मळभागे, शेख गुरुजी, अमित (बंटी) सूर्यवंशी, होमगार्ड संजय सावरगावे, डॉ. अनिल इंगोले, आनंद जीवने, शेंडगे मामा, बाबुराव लांडगे, शिवा कांबळे आदींनी विशेष परिश्रम घेतले. सर्व समाजघटकांचा सहभागही उल्लेखनीय होता.

दरम्यान, महादेव मंदिर यात्रा कमिटीच्या एका लिंगायत समाजाची रचनेबाबत नागरिकांकडून सामाजिक समतोल राखला गेला नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

तसेच आगामी नगरपंचायत निवडणुकीच्या हिंदू धर्म पार्श्वभूमीवर या मुद्द्यावर मते मागत असल्यास त्यांना कात्रज चा घाट कसे दाखवायचे चर्चा सुरू असल्याचे चित्र आहे. नगरपंचायत सत्ताधाऱ्यांकडून आयोजित शेवटच्या यात्रांपैकी हे एक आयोजन असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे.

# अशोक पाटील यांनी शाळेशी जिव्हाळ्याचे संबंध जोडले - राजेंद्र खारपाटील

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** चिरनेर येथील पी पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या पी.डी. खारपाटील माध्यमिक शाळा व राजेंद्र खारपाटील उच्च माध्यमिक शाळेचे वरिष्ठ लेखनिक अशोक अनंत पाटील यांनी 33 वर्ष प्रदीर्घ सेवा बजावत, आपल्या . वरिष्ठ लेखनिक पदसेवेतून 31 मार्च 2026 रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

वरिष्ठ लेखनिक अशोक अनंत पाटील यांनी सुरुवातीच्या काळात अलिबागच्या कोकण एज्युकेशन सोसायटीत 24 वर्ष सेवा बजावली. तर पी पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीत 2016 मध्ये रुजू होऊन, त्यांनी नऊ वर्ष ,नऊ महिने उत्तम सेवा बजावून त्यांनी शाळेशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवले आहेत. सत्कारमूर्ती अशोक पाटील यांचा सेवापुर्तीचा सत्कार समारंभ 25 मार्च रोजी चिरनेर शाळेत आयोजित करण्यात आला होता. यावेळी सत्कारमूर्ती अशोक पाटील व सहचारणी सपना पाटील यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, साडी चोळी व भेटवस्तू देऊन अध्यक्ष पांडुरंग खारपाटील यांच्या कुटुंबीयांतर्फे आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी पी पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील यांनी अशोक पाटील यांनी आमच्या शाळेशी घरातल्यासारखे जिव्हाळ्याचे संबंध जोडले आहेत. आपण सेवेतून निवृत्त झाले आहात. तरी देखील पुन्हा या शाळेची आपल्याकडून शैक्षणिक सेवा व्हावी. अशी अपेक्षा करतो. अशा भावना उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांनी व्यक्त केल्या. तर उरण तालुका पंचायत समितीच्या माजी सभापती



वैशाली पाटील यांनी अशोक पाटील यांच्या पूर्वीच्या गमतीदार स्वभावाचे आपल्या भाषणातून वर्णन करून, माझ्या संपूर्ण कुटुंबाचे त्यांच्याशी मैत्रीचे नाते असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. यावेळी शिक्षक डी.पी. पाटील यांनी त्यांच्यासाठी आणि शाळेसाठी केलेल्या कार्याची गाथा वाचून दाखवली. तसेच शैक्षणिक क्षेत्रातील वरिष्ठ लिपिक म्हणून त्यांना चांगला अनुभव असल्याचे देखील त्यांनी सांगितले. शाळेतील प्रयोगशाळेतील प्रदीप रसाळ यांनी त्यांचे कर्मचाऱ्यांबरोबर मैत्रीचे, प्रेमाचे संबंध असल्याची जाणीव करून, अशोक पाटील यांनी यापूर्वी राजकीय, सामाजिक क्षेत्रातही उत्तम निडरतेने कामगिरी केली असल्याचा उल्लेखही त्यांनी भाषणातून केला.

त्याचबरोबर सहाय्यक शिक्षक जीचंद भगत यांच्यासह अनेक नातेवाईकांनी अशोक पाटील यांचा स्वभाव व शैक्षणिक कामाबद्दल भावनिक होऊन भावना व्यक्त केल्या. शेवटी अशोक पाटील यांच्या सहचारिणी सपना पाटील यांनी आपल्या मनोगतातून अगदी भावनिक होऊन, अशोक पाटील यांना शैक्षणिक कामाविषयी वारंवार प्रोत्साहन दिले असल्याचे सांगून, कौटुंबिक आयुष्यात माझ्या पतीने आमच्या कुटुंबाचे नेतृत्व करत उत्तम साथ देली असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला अध्यक्ष पांडुरंग खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील, संचालिका अर्चना ठाकूर, प्रशासन अधिकारी व्ही ए पाटील, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादुर, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, मंदा घरत, स्मिता मसुरकर, माजी सभापती वैशाली पाटील, प्रदीप रसाळ, डी पी पाटील, जिचंद भगत, डॉ. प्रज्योत पाटील, सुरेंद्र कठोर, नवगाव मच्छीमार सोसायटीचे माजी चेअरमन, कोएसो नवगाव शाळेची विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, मुले जावई यांच्यासह नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होते. प्राध्यापिका मंथना ठाकूर यांनी सुंदर शब्दातून सूत्रसंचालन केले.